**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1**
**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# भारतीय महिलांची मराठी साहित्य क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल

**डॉ. कल्याणी नाना शेजवळ,** अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्वरी ता. भिवंडी जि. ठाणे

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशामध्ये अनेक जात, धर्म, पंथ आणि वर्णाचे लोक अनेक वर्षांपासून पिढ्यानेपिढ्या एकत्र राहत आहे. परंतु या देशातील समाज हा जात, रुढी, परंपरा, धर्मशास्त्र, नीती या तत्त्वावर करकचून बांधलेला आहे. या देशाची व्यवस्था ही जात, धर्म, वर्ण, स्त्री आणि पुरुष भेद याच्या भक्कम पायावरती ही उभी आहे. धर्म, संस्कृती, समाजव्यवस्था, जात, धर्म, वर्ग, स्तर भेद, क्षेत्र, वर्ण, देश, प्रदेश पातळीवर देखील हा भेद लक्षात येतो, हे भेद कळत नकळत जन्मापासून ते मरेपर्यंत कुठल्या ना कुठल्या रूपात दृश्य अदृश्य स्वरूपात एकमेकांमध्ये गुंफत, एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत अविरतपणे कमी-अधिक स्वरूपात पुढे सरकत जाताना दिसतात. मातृत्व कर्तुत्व आणि नेतृत्व या तीनही पातळ्यांवरती स्त्रीचा असणारा लढा हा आजच्या स्त्रीच्या साहित्यतून कालभान आणि विश्वभान निर्माण करणारा आहे.

साहित्य आणि समाज हे परस्पर पूरक आहे. समाजाशिवाय साहित्य आणि साहित्याशिवाय समाज जन्माला येऊ शकत नाही. त्यामुळे समाज आणि साहित्य या दोघांचाही साहित्याच्या पटलावरती विचार करत असताना स्त्री आणि पुरुष महत्त्वाचे केंद्रबिंदू ठरत आहे. समाजामध्ये घडणाऱ्या घटकांचा या दोन्ही केंद्रांवर त्याचा परिणाम होत असतो. पिढ्यानपिढ्या पुरुष केंद्रा भवती फिरणारी स्त्री कशी बदलत गेले आहे? हे बदल होण्यासाठी समाजामध्ये घडणाऱ्या घटना, प्रसंग, चळवळी, नियतकालिके, शिक्षण, समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न. राजाराम मोहन रॉय, गोपाळ आगरकर, हिंदू कोडबिल, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय राज्यघटना, महर्षी कर्वे स्त्रियांना मिळालेला शिक्षणाचा अधिकार, पाश्चात्य स्त्रीवादाचा परिणाम, भारतात स्त्रीवादाचे झालेले आगमन, त्या निमित्ताने छोट्या- मोठ्या रूपात स्त्रियांच्या होणाऱ्या सभा, परिषदा, चर्चासत्र, लेखन हे देखील स्त्री साहित्याच्या लेखनाला प्रेरक ठरते.

सरकारने १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले. त्यामुळे महिला सक्षमीकरण, महिला सबलीकरण, महिला साक्षरता, महिला सुरक्षा, महिला आयोग, महिलांसाठीच्या योजना यामुळे एक राजकीय, समाजक्रांती आणि सामाजिक बदल स्त्रियांच्या स्वरूपात घडत गेला. बालविवाह, जरठविवाह, सतीप्रथा,सर्व पातळ्यांवरील असमानता, एक पत्नीत्वाचा कायदा, संतती नियमन कायदा, घटस्फोट, हुंडापद्धती, पोटगी, स्त्री आणि पुरुष भेद, समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन, इत्यादीमुळे पिढ्यानपिढ्या चार भिंतीमध्ये बंदिस्त असलेली स्त्री स्वयंपाक घरातून माजघरात आली, माजघरातून ती उंबऱ्याच्या बाहेर पडली. शिक्षणासाठी ती घराच्या बाहेर पडली. याचा परिणाम ती स्वतःचे स्वत्व शोधू लागली. यातून तिला आत्मभान प्राप्त होवू लागले. मी पण माणूस आहे, मला स्वतःच्या भावभावना आहेत, स्त्री म्हणून स्वतंत्र निर्णय घेऊ जगता येते? परंतु हे जगत असताना सर्व पातळ्यांवर तिची कळत नकळत होणारी ससेहोलपट ते आपले लेखणीतून शब्दबद्ध करू लागली.माजघरातून बाहेर पडलेली स्त्री या जगामध्ये वावरत असताना स्वतःला शोधू लागली. स्त्री मध्ये असणारी बुद्धिमत्ता, हुशारी, तिचे कोंडलेपण, तिची सहनशीलता, तिचा होणारा कोंडमारा, पिढ्यानपिढ्या पुरुषसत्ता व्यवस्थेने दिलेला बंदीवास, तिचं


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

जगणं, दुःख, दारिद्र्य, तिच्यावर होणारा अन्याय, अत्याचार ती आपल्या लेखणीतून समाजाचा, कुटुंबाचा प्रथमत: विरोध पत्करून लिहायला लागली.

स्त्री साहित्याच्या लेखनाला प्रमाणात बुद्धकाळामध्ये काळापासून सुरुवात झाली. बौद्धकाळामध्ये स्त्रिया स्वतंत्र होतं होत्या संसारिक दुःख भोगातून मुक्तता मिळण्यासाठी अनेक स्त्रियांनी भिक्षु संघात प्रवेश केला होता. या स्त्रियांनी 'थेरीगाथा' लिहिलेले आहे. हे लेखन स्त्री साहित्य लेखनाचा पहिला प्रारंभ म्हणता येईल. या थेरीगाथेमध्ये त्र्याहत्तर बौद्ध भिक्षुनीच्या यांच्या वचनांचा संग्रह आहे. वैदिक काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त होता. सकाळ-संध्याकाळ होम हवन करून वेदाअध्ययन करीत असत ब्रह्मवादिनी स्त्रियांना यज्ञ कार्य वेदाध्ययन यांचे अधिकार प्राप्त होते. "सुलभा, मैत्री, गार्गी इत्यादी स्त्रिया विद्वत्तेमुळे प्रसिद्ध होत्या. या स्त्री आपले इच्छेनुसार दीर्घकाळापर्यंत ज्ञानर्जन करीत असत. यातील काही स्त्रियांनी आजीवन ब्रह्मचर्याचे पालन करून अध्यात्मिक उन्नती साधली आहे. या स्त्रियांनी वेदाध्ययन, काव्यरचना, त्याग, तपस्या करून ऋषिपद प्राप्त केले आहे. काहींना मंत्राचा साक्षात्कार झाला आहे. ऋग्वेदात ७७ ब्रह्मवादीनींचा उल्लेख आहे. महानुभाव काळातील स्त्री पंथामध्ये सहभागी होऊन धर्माचे आचरण आत्मसात करू लागली. मराठी साहित्यातील आद्य कवयित्री महादंबा यांनी लिहिलेले 'धवळे' स्त्री साहित्य लेखनाचा प्रारंभ म्हणता येईल, तर संत ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताई यांनी लिहिलेले "ताटीचे अभंग" मध्ययुगीन काळातील समाजचित्रण आणि नातेसंबंध स्पष्ट करणारी आहे. तुकारामांची शिष्या बहिणाबाई यांनी लिहिलेले अभंग, तर रामदास स्वामींची शिक्षा वीणाबाई रामदासी यांनी लिहिलेले अभंग स्त्री साहित्यचा पूर्वार्धच म्हणता येईल. मात्र याच कालखंडात 'स्त्री जन्म म्हणूनही न व्हावे उदास' असे परखड विचार पाडणारी, आपल्या निर्णय, स्वातंत्र्य विचार स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या संत जनाबाईंचे अभंग स्त्री वादी साहित्याची सुरुवातच म्हणता येईल, "तामिळनाडूचे ओव्वै आणि अंदाळ आंध्र प्रदेशची मोल्ला आणि तरिगोंडा वेंकमब्बा, केरळची चंगक्रोतुअम्मा, कर्नाटकची अक्का महादेवी, उत्तर गुजरात राजस्थानची चंद्रसखी आणि मीरा, उत्तर प्रदेशातील सहजो आणि दारी, या बंगालची चंद्रवती, ओरिसाची माधवी दासी, काश्मीरची ललेश्वरी आणि इतर अनेक संत्र्या होऊन गेल्या महाराष्ट्रात मुक्ताई ते वेनाबाई आणि पुढेही अगदी १८-१९ व्या शतकापर्यंत परमार्थिक वाटेने जाणाऱ्या शुचिष्मंत स्त्रियांची मोठी मांदियाळी दिसते."[१]

१९५०-१९७५ हा काळ स्त्री च्या मनाचा बदलत्या काळाची जाणीव करून देणारा कालखंड ठरला आहे. १९ वे शतकात स्त्रियांच्या शिक्षणाला थोड्याफार प्रमाणात वेगाला अनेक क्षेत्रात स्त्रियांनी प्रवेश केलेल्या दिसतो वैचारिक जागृतीचा हा कालखंड म्हणता येईल. १८१८ मध्ये मराठी सत्तेचा शेवट होऊन ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली आणि सामाजिक चळवळी बरोबर राजकीय चळवळीने देखील वेग धरला. मराठी आत्मचरित्रांमध्ये लेखिका डॉ. लक्ष्मीबाई टिळक यांचे स्मृतीचित्रे हे आत्मचरित्र महिलाचा धडक दगड ठरते. तर महात्मा गांधीच्या जीवनावर लिहिलेले पहिले आत्मचरित्र लिहिणाऱ्या अवंतिकाबाई गोखले यांचे गांधी जीवनावरील लेखन इतिहासाला नवा उजाळा देते. बंगालमधील भारतीय मासिक संपादित करणाऱ्या 'सुवर्ण कुमारी देवी' महाराष्ट्रातील पहिली पदवी संपादन करणारी सोराबाजी. मुक्ता साळवे यांचा १९९५ मध्ये 'ज्ञानोदय' मध्ये मांग महाराजांच्या दुःखाविषयी लिहिलेला निबंध लिहिला. आदिवासी भागात गुरे वाढणाऱ्या मुलांच्या शाळेसाठी 'कुराणशाळा' सुरू करणाऱ्या ताराबाई मोडक मतिमंद आणि कुष्ठरोग यांसाठी शाळा काढणाऱ्या मिशन ब्रदर्स ऑफ चारोटी या जागतिक पातळीवरील संघटनेची स्थापना करणाऱ्या मदर टेरेसा, 'कोसबाडच्या टेकडीवरून, शिक्षणाचा वसा चालविणाऱ्या पद्मश्री


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

अनुताई वाघ. वारली समाजाच्या चित्रण करणाऱ्या गोदावरी परुळेकर यांचे "माणूस जेव्हा जागा होतो" हे आत्मचरित्र तर नजुबाई गावित यांचे 'आदोर'नावाची आत्मचरित्र आदिवासी समाजातील दुःख आणि दारिद्र्य याचे चित्रण घडवते.

"स्त्रियांच्या वाटचालीत स्त्रिया ज्ञानोपासनेपासून वंचित ठेवले गेल्या पुरुष सत्ता मानसिकतेने स्त्रियांचे जीवन मर्यादित आणि त्यांचे अनुभव विश्व खुंटीत केले असे असले तरी श्री अडाणी नव्हती तर ती प्रतिभावंत आणि बुद्धिवंत होती त्याची चमक परंपरेचा शोध घेतला तर आपल्याला बऱ्याच ठिकाणी सापडतील तिची प्रतिभा तिची बुद्धिमत्ता जगण्याविषयीचे शहाणपण असलेली श्री अस्तित्वात होती फक्त ती इतिहासात आली नाही कारण स्त्रियांच्या या प्रतिभेचे दस्तऐवजी करण झाले नाही त्यामुळे मध्ययुगीन काळात स्त्रिया श्री साहित्यातील स्त्रियांचे योगदान अंधारात राहिले असे प्रतिपादन जेष्ठ लेखिका कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी रविवारी केले आम्ही सिद्ध लेखिका च्या पुणे विभागातर्फे आयोजित केलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून स्त्रियांच्या साहित्याबद्दल अरुणा ढेरे यांनी खंत व्यक्त केली की साहित्यातील स्त्रियांचे योगदान दुर्लक्षितच आहे असे त्यांनी प्रतिपादन केले"[२]

मराठी साहित्यातली तिसरे जग समाजापुढे मांडणाऱ्या तृतीयपंथीय माणसाचे आणि त्याच्या जीवनाच्या दारूण पराभवाचे चित्रण सुद्धा या समकालामध्ये लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखणीतून आपल्याला दिसते. उदा.हिजडे- स्वाती चांदोरकर, मी का नाही -पारू मदन नाईक, मी हिजडा- मी लक्ष्मी लक्ष्मीनारायण त्रिपाठी, धर्म आणि समलैंगिकता- देवदत्त पटनायक यांच्या या पुस्तकाचा अनुवाद सोनाली नवांगुळ यांनी केलेल्या दिसतो. यातून समाज अशा व्यक्तींना  काशी वागणूक देत असतो याचे चित्रण आले आहे.

'सावित्रीच्या लेकी' हे संतोष मधुकर मुसळे यांचे अनुश्री प्रकाशनाने प्रकाशित केलेले पुस्तक राज्यातील उपक्रमशील महिला अधिकारी व शिक्षकांच्या यशोगाथा सांगणारी पुस्तक आहे एकूण ५६ महिलांनी शिक्षण क्षेत्रात कोणकोणते शैक्षणिक उपक्रम करून विद्यार्थ्यांना आनंदी शिक्षण देण्यात च्या प्रयत्न केलेला आहे समाज आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयीची आवड कशी निर्माण केली याचे महत्त्व सांगणारी हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरते तर सुनील कुमार लवटे यांचे महाराष्ट्रातील महिला बालकल्याण दशा आणि दिशा ही पुस्तक अक्षर वाङ्मयाने प्रकाशित केले असून या पुस्तकात त्यांनी गुन्हेगार बालकामगार उपेक्षित अनाथ महिला अपंग इत्यादींचे प्रश्न मांडले आहे.

इंदुमती भारंबे यांचे 'स्त्री मानसशास्त्र' पुस्तक स्त्री शरीरशास्त्राचा लेखाजोखा मांडताना स्त्रीचे शरीर, तिचे आरोग्य, तिचे बदल, नैसर्गिकता,वृत्ती, प्रवृत्ती, अपेक्षा, भावना, समस्या, व्यंग, स्वभाव, वर्तन, जबाबदारी, नैतिकता, समुपदेशन, संरक्षण,ध्यान आणि कुटुंब व्यवस्थापन........ इत्यादींवर लिहिताना त्या स्त्री जीवनात वैदिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत झालेल्या स्त्री जीवनाविषयीचे महत्व अधोरेखित करतात.

पद्मभूषण शकुंतला परांजपे यांचे "समाजस्वास्थ्य" या र.धो. कर्वे यांच्या सोबतचे या मासिकासाठी केलेले कार्य समाज स्वस्तासाठी महत्त्वाची ठरते. गांधी सत्याग्रहातून तुरुंगवास भोगणाऱ्या साहित्यिक प्रेमा कंटक यांचे साहित्य देखील स्त्री साहित्यिक म्हणून योगदान देणारे ठरले आहे. समकालीन भारतीय साहित्यातील मुसलमानांची प्रतिमा या विषयावर संशोधन करणाऱ्या रजिया पटेल यांचे लेखन भारतीय स्त्री साहित्यातील योगदान स्पष्ट करणारे आहे. तर निराधारांची माता ठरलेल्या सिंधुताई सपकाळ यांचे 'मी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

वनवासी' हे आत्मचरित्र स्त्री साहित्यातून स्त्री जीवनाच्या दुःखाच्या कक्षा स्पष्ट करणारे आत्मचरित्र स्त्री संघर्षाच्या यशाची कहाणी सांगणारी ठरले आहे.

ज्या काळात स्त्री शिक्षणाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली त्या काळात ताराबाई शिंदे यांनी लिहिलेली स्त्री पुरुष तुलना, हे पुस्तक समाजातील रूढीपरंपरेचे परखड वास्तव समाजापुढे मांडते. स्त्री पुरुष मधील समानता, स्वातंत्र्य न्यायव्यवस्था, इत्यादींवर ताशेरे उडून समाजव्यवस्था आणि पुरुषसत्ता पद्धती समाजातील रूढी, परंपरा, स्त्रीला कशा पद्धतीने दुय्यमत्व दुय्यम ठरवतात, हे आपल्या लेखणीने विचार मांडणारे ताराबाई शिंदे यांची पुस्तक वाचकाला गंभीरपणे विचार करायला भाग पाडते. डॉ. विलास साळुंखे म्हणतात त्याप्रमाणे "स्त्रीवादी पुरुष संकल्पनेचा विकास आणि विस्तार हवा आहे. तसेच आजच्या पिढीतील पुढे येणाऱ्या स्त्री चेही मानसिक प्रबोधन हवे आहे दोन पिढ्यांमध्ये कालसंगत सुसंवादाची गरज आहे."[३]

स्त्रियांच्या बाबतीत एक महत्त्वाची घटना म्हणजे १९०४ मध्ये स्त्रियांची पहिली भारत महिला परिषद आयोजित केली होती. अनेक महिला त्यामध्ये सहभागी झालेल्या होत्या. मात्र काहींनी या परिषदेची तर उडवली, पण मात्र आपली मते विचार भावना मांडण्यासाठी एकत्र आलेल्या स्त्रिया स्त्री बदलाचे महत्त्वाचे पाऊल म्हणता येईल. स्त्रियांनी जसे कथा, कविता, कादंबरी, ललित गद्य आत्मचरित्र, अनुवाद भाषांतर, नाटक यासारखे वाङ्मय प्रकार हाताळले त्याच पद्धतीने स्त्रियांनी त्या त्या काळात निर्माण झालेल्या नियतकालिकासाठी केलेले लेखन देखील महत्त्वपूर्ण ठरते. ही नियतकालिके स्त्रियांच्या जीवनात आलेल्या साध्या साध्या अनुभवातून त्यांना शिक्षण प्रशिक्षण देऊन कसे स्वावलंबी बनवते याची चित्रण आपल्याला बऱ्याच लेखातून दिसते. उदाहरणार्थ सुमित्र, महाराष्ट्र महिला गृहलक्ष्मी ,संवाद, स्त्री, मनोरमा, संजीवनी, शारदा, जननी, गृहलक्ष्मी, वारंगाना, वनिता, विश्व जैन महाराष्ट्र, महिला परिषद, मिळून साऱ्याजणी, बाईचा माहेर, सखी, मानिनी, महिला आंदोलन पत्रिका इत्यादी यासारख्या नियतकालिकात स्त्रियांनी केलेले लेखन हे भारतीय साहित्यातील वेगळे पण ठरते. वरील विधान हे स्त्रियांच्या सर्व पातळ्यांवरील होणाऱ्या बदलाचा परामर्श घेणारे आहे. कारण जोपर्यंत समाजामध्ये किंवा स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होत नाही, तोपर्यंत समाजपरिवर्तन होणे शक्य नाही. समाजाच्या जीवनशैलीमध्ये राहणीमानामध्ये जसा बदल पाहावयास मिळतो तो बदल जोपर्यंत स्त्री कडे बघताना किंवा न्याय देताना, समानतेच्या पातळीवरती माणूस म्हणून वागणूक देण्याच्या कृतीवरती आत्मसन्मान किंवा निर्णयाच्या स्वातंत्र्याच्या पातळीवरती उतरत नाही, तोपर्यंत समीक्षाकांना स्त्रियांच्या साहित्यामध्ये जाणवणारा तोच तोचपणा जाणवणार नाही. व्यवस्थेमध्ये होणारा बदल समाजामध्ये होणारा बदल हे साहित्यामध्ये चित्रण करणारा महत्त्वाचा घटक आहे.

'पासंग' या समीक्षा ग्रंथाने सुप्रसिद्ध असलेल्या कुसुमावती देशपांडे. यांचे 'दीपककळी, 'दीपदान आणि ' मोळी' हे तीन कथासंग्रह साहित्यात मोलाची भर टाकतात, तर ' मराठी कादंबरी पहिले शतक' हे पुस्तक समीक्षाकांना कादंबरीचा इतिहास सांगताना दिसतात, देशपांडे यांनी इंग्रजी विषयाचे अध्यापन केल्यानंतर नागपूर दिल्ली येथे आकाशवाणीवर अधिकारी म्हणून काम केले. महाभारताच्या भाष्यकार, जात ही जात नाही असं म्हणणाऱ्या समाजाचा मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून चिकित्सा संशोधन करणाऱ्या डॉ. इरावती कर्वे यांची साहित्यिक योगदान महत्त्वपूर्ण ठरते. 'परिपूर्ती, 'भवरा, ' गंगाचली' हे ललित लेख मराठी माणसं, त्यांची संस्कृती, त्यांची जात, धर्मानुसाररचना मानसिकतेवर त्यांनी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

बरेच लेखन केलेले आहे 'मनुष्याच्या डोक्याच्या कवटीची आरोप प्रमाणता' हा प्रबंध अमेरिकेतील विद्यापीठात पाठ्यपुस्तकात तो नेमला गेलेला आहे. यावरून स्त्रियांच्या साहित्यिक योगदानाची पोचपावती मिळते.

विभावरी शिरूरकर यांची 'बळी' ही कादंबरी गुन्हेगार समाजाचे चित्रण करते. कराड येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा, तामिळ लोककथा मराठी भाषेत लिहिणाऱ्या, ओल्ड डेक्कन डेज हे पुस्तक आणि टागोरांच्या कथा मराठी भाषेत अनुवाद करणाऱ्या' लोकसाहित्याची रूपरेखा' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिणाऱ्या दुर्गा भागवत यांचे लेखन मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावणारे ठरले आहे. स्त्रियांच्या साहित्यकृतींचे भाषांतर सुद्धा अनेक भाषेमध्ये झालेले आहे.उदा. शांताबाई कांबळे यांचे माझ्या जन्माची चित्तरकथा हे दलित साहित्यातील आत्मचरित्र इंग्रजी फ्रेंच भाषेत अनुवादित झालेले आहे तर अरुणा ढेरे यांचा कृष्ण किनारा हा कथासंग्रह गुजराती व हिंदी भाषेमध्ये झाले आहे.

भारतीय साहित्याचा सर्वोच्च पुरस्कार म्हणून ओळखला जाणारा त्याने ज्ञानपीठ पुरस्कार स्त्रियांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेणाऱ्या ठरला आहे. रमा जैन यांच्या कौटुंबिक ट्रस्ट मधून या पुरस्काराची रक्कम या पुरस्कारासाठी दिली जाते. १९६५ पासून दरवर्षी भारतीय भाषापैकी एका साहित्यकृतीला उत्कृष्ट योगदान देणाऱ्या साहित्यिकाला हा पुरस्कार दिला जातो. सतराव्या पुरस्कारानंतर मात्र तो लेखकाच्या संपूर्ण साहित्यबद्दल विचार करून दिला गेला. मात्र त्यानंतर हा पुरस्कार त्या साहित्यिकाच्या संपूर्ण साहित्य योगदानाचा विचार करून दिला जाऊ लागला. वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती, कादंबरीला तो दिला गेला आहे. त्यानंतर कुसुमाग्रज, विं.दा करंदीकर, डॉ. भालचंद्र नेमाडे यांना जसा दिला गेला त्याचप्रमाणे १९७६ मध्ये पूर्ण अशापूर्ण देवी यांच्या (प्रथम प्रतिशृती) १९८१ मध्ये अमृता प्रीतम यांच्या (कागज से कॅनव्हास) १९८२ मध्ये महादेवी वर्मा (उत्कृष्ट साहित्यनिर्मिती) १९८९ मध्ये कर्तुल ऐन हैदर १९९६ मध्ये महाश्वेतादेवी २००० मध्ये डॉ. इंदिरा गोस्वामी २०११ मध्ये डॉ. प्रतिभा रॉय यांना प्रदान करण्यात आला. हे भारतीय भाषांमधील स्त्रियांचे साहित्यिक योगदान वाखण्यासारखे आहे.

'स्त्री साहित्याचा मागवा खंड' एक आणि दोन हे दोन खंड मार्गदर्शक डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित आणि मंजिरी ताम्हणकर यांनी संपादित केले. स्त्रियांचा साहित्यिक अंगाने अभ्यास करण्यासाठी खूप मोठ्या कालखंडाचा पट या खंड रूपाने स्त्रियांनी लिहून ठेवला आहे. 'मराठी साहित्यातील संज्ञा संकल्पनाचा कोश' हा महत्वपूर्ण खंडाचे सहसंपादन म्हणून प्रभा गनोरकर आणि सहकारी यांचे काम महत्त्वपूर्ण ठरते. 'कुटुंबप्रवर्तनीती' पुस्तके लिहिणाऱ्या मिसेस फरार 'शारदा सदन'ची स्थापना करणाऱ्या 'स्त्री आणि श्री धर्मनीती' या लेखाच्या लेखिका पंडिता रमाबाई सेवासदनची स्थापना करणाऱ्या आणि शैक्षणिक कार्याचा वसा पुढे नेणाऱ्या रमाबाई रानडे यांनी समाजाचा रोश पतकरून लेखन केले.

प्रिया तेंडुलकर,, सानिया, मेघना पेठे, शिल्पा कांबळे प्रज्ञा पवार, प्रतिमा जोशी, वंदना भगत, मनस्विनी लता रवींद्र नीरजा, उर्मिला पवार, प्रतिमा इंगोले, मीरा बोरवणकर......इत्यादी लेखकांनी केलेले लेखन, समाजामध्ये झालेल्या बदलाचे ते चित्रण करते. तसेच स्त्रीमध्ये शिक्षण, नोकरी, लग्नव्यवस्था, मातृत्व, शारीरिक गरज, नैसर्गिक धर्म, समलिंगी संबंध, सरोगसी मदर, बारसंस्कृती आणि उदरनिर्वाह इत्यादी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

संदर्भात एकूण पर्यावरणातील अनुभवांबाबत आपली मत किंवा निर्णय घेताना दिसतात. हा स्त्री साहित्याच्या लेखनातील झालेला बदल महत्त्वाचा वाटतो.

१. मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य महानगरीय साहित्य, आदिवासी साहित्य, प्रादेशिक साहित्य, विज्ञान साहित्य इत्यादी अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले, त्या सगळया प्रवाहामध्ये स्त्रियांनी केलेले लेखन आपल्याला दिसून येते. भारतीय समाजातील स्त्रियांच्या साहित्यिक वाटचालीचा आणि योगदानाचा जेव्हा विचार केला जातो, तेव्हा स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक धार्मिक, प्रादेशिक आणि जातीय विषमता इत्यादी सारख्या घटकांचा विचार साहित्याच्या संदर्भात करावा लागतो.

२. लेखन करणाऱ्या लेखिका ज्या पर्यावरणात आता त्या पर्यावरणात घडणाऱ्या घटना प्रसंग त्यातून समाज आणि पुरुष व्यवस्थेमध्ये झालेल्या चांगल्या वाईट बाबींचा सुद्धा त्या परामर्श घेतात. स्त्रीभृणहत्या, स्त्रियांचा मासिक धर्म, नैसर्गिक मातृत्व, गरोदरपण, बाळंतपण, सरोगसीमदर, समलिंगी संबंध आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह, हुंडाबळी, बलात्कार, विवाहाला होणारा सामाजिक विरोध, त्यातून घडणारे खून, मारामाऱ्या, जाणारे बळी, मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न, बलात्कारीत स्त्रियांचे प्रश्न, मुस्लिम स्त्रियांचे आदिवासी आणि दलित स्त्रियांचे प्रश्न, नोकरी व्यवसायातील स्त्रियांचे आणि नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना दिली जाणारी अपमानित वागणूक, लैंगिक शोषण, अराजगता, हिंसाचार, वर्चस्ववाद आणि मूलतत्त्ववाद, हत्याकांड इत्यादींसारखे प्रश्न स्त्री लेखिका आपल्या साहित्यातून मांडू लागली, जे प्रश्न पुरुषांनी देखील आपल्या साहित्यातून मांडलेले आहे. साहित्यातील काही समानतेचा धागा जर लक्षात घेतला तर, स्त्रियांच्या साहित्यात जाणवणारा तोच तोचपणा स्त्री लेखनातील वेगळेपण दाखवून देतो. आणि भारतीय स्त्रियांच्या लेखनातील वेगळेपण कालखंडाचा नवा दस्ताऐवज निर्माण करते. साहित्याच्या नव्या कक्षा आणि परिघृंदावण्यास स्त्रियांचे साहित्य लेखन भारतीय साहित्याचे वेगळेपण मांडते.

३. १९९० नंतर जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरण या तत्त्वत्थ्रेचा भारताने स्वीकार केला. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात शिरकाव केला. एकाच वस्तूचे शेकडो प्रोजेक्ट तयार झाले. त्याला विज्ञान तंत्रज्ञानाची जोड मिळाली. त्याचा परिणाम एकूणच स्त्री जीवनावरती झाला. स्त्रियांच्या जीवनशैलीमध्ये आणि राहणीमानात बदल झाला. मोजक्याच उच्चशिक्षित स्त्रियांच्या हातात पैसा खेळू लागला.स्त्रीच्या सौंदर्याचे बाजारू मूल्य वाढले. सौंदर्यप्रसाधने भारताला भांडवलदारांना नफा मिळवून देऊ लागली. प्रसारमाध्यमांमध्ये स्त्रियांचा वापर केला जाऊ लागला. त्यामुळे स्त्रियांना थोड्याफार प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले असले तरी, स्त्रियांची वेगवेगळया पातळीवरती वेगवेगळया पद्धतीने, स्तरावर शोषण होऊ लागले. त्याचे चित्रण मराठी स्त्री लेखिका आपल्या साहित्यातून करू लागल्या. लेखन करणाऱ्या लेखिकांच्या बाबतीत त्या ज्या ठिकाणी नोकरी काम कर्तव्य राबवत असतात त्या त्या क्षेत्रात त्यांना आलेले अनुभव त्या आत्मचरित्राच्या रूपाने मांडताना दिसतात. उदा. सांगते ऐका हंसा वाडकर

४. या कालखंडातील महत्त्वाचा बदल म्हणजे कुठल्याही क्षेत्रामध्ये उत्तुंग कामगिरी करणाऱ्या स्त्रीच्या कर्तुत्वाची नोंद ही कागदावरती होत असल्याकारणाने पुढच्या पिढीला त्या त्या कालखंडात केलेल्या स्त्रियांच्या कार्याचा दस्तऐवज प्राप्त होणारा हा कालखंड आहे. जो दस्ताऐवज उजेडात आलाच नाही.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

जसं मराठी साहित्यामध्ये प्राचीन साहित्य मध्ययुगीन साहित्य आहे या दोन्हीही कालखंडामध्ये लेखन करणाऱ्या स्त्रिया आपल्याला दिसून येतात. साहित्य प्रकारांमध्ये कविता कथा, कादंबरी, ललित गद्य, नाटक इत्यादी प्रकारांमध्ये देखील स्त्रियांनी लेखन केलेले आहे.

५. भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात संदर्भातील वापरलेल्या स्त्री प्रतिमा देखील उल्लेखनीय ठरतात. स्त्रियांच्या साहित्याची भाषा ही साधी सरळ सोपी आहे. ती अरेरावी करत नाही. परंतु आपल्यावरती झालेल्या अन्याय-अत्याचाराचे चित्रण करण्यासाठी ती अलंकाराचा वापर करते. म्हणी वाक्प्रचारांचा वापर करते प्रतिमा प्रतीकांचा वापर करताना दिसते. स्त्रियांच्या साहित्यामध्ये मोठे इमारती फ्लॅट संस्कृती क्लब हाऊस स्विमिंग पूल बचत गट दुकाने फूटपाथ लोकल ट्रेन इत्यादी जगण्यातली जीवनाचे चित्रन येऊ लागले. वेळ काळ गती पैसा शिक्षण विज्ञान तंत्रज्ञान बदलती जीवनशैली बहुराष्ट्रीय कंपन्यांचा धबधबा इत्यादी दबावातून मॅनपॉवर, मनीपॉवर आणि मसलपॉवर निर्माण यावर निर्माण झालेले जग स्त्रियांच्या साहित्यातून वाचायला मिळते. त्यामुळे आज तरी मराठी लेखिकांच्या अनुभवी विश्वाचा परीघ जरी वाढला तरी आजच्या, भविष्यकाळातील तयार झालेल्या नवीन समस्या या लेखिकांच्या साहित्याचा केंद्रबिंदू ठरत आहे/ठरणार आहे. याचा परिणाम स्त्रियांच्या जीवनात जशी व्यामिश्रता निर्माण झाली ,तसेच विविध विविधता आली. तसेच स्त्री लेखिकांच्या साहित्याची क्षेत्रसुद्धा व्यापक बनवू लागले. ते नव्या साहित्याच्या आणि अनुभव विश्वाच्या शोधात निघाले आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. जाणिवा जाग्या होताना- डॉ. अरुणा ढेरे, सुरेश एजन्सी प्रथम आवृत्ती मे- २०१५ पृष्ठ क्र. २७
२. महाराष्ट्र टाइम्स.कॉम | Updated: 17 Jun 2019, 4:00 am
३. स्त्रियांच्या नियतकालिकांचा इतिहास डॉ. स्वाती सात्विक स्वाती कर्वे डायमंड प्रकाशन, जुलै २०१७ पृष्ठ क्र. २४८

 Copyright © | JET Network, All Rights Reserved